## बी.एड. विशेष शिक्षण (HI/VI/ ID) शिक्षणक्रम (२०२०-२२) या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेऊ इच्छीणाऱ्या उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना.

**विद्यापीठाचा हा शिक्षणक्रम सामान्य शाळेतील शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी नसून विशेष शिक्षणक्षेत्रातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर अध्यापन करण्याची इच्छा असणाऱ्या उमेदवारांसाठी आहे. ह्या शिक्षणक्रमाचे विद्यापीठाच्या सेवांतर्गत बी.एड.शी साधर्म्य नाही.**

**प्रवेश प्रक्रियेचे टप्पे**




**विशेष सूचना : या शैक्षणिक वर्षात COVID-19 च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने संपूर्ण प्रवेशप्रक्रिया online पद्धतीने पूर्ण करण्याचे ठरविले आहे. या आदेशानुसार सर्व कार्यवाही होईल. उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यातील कार्यवाही विहित कालावधीत केली नाही तर प्रवेश प्रक्रियेतून तो उमेदवार आपोआप बाहेर पडेल. त्यानंतर त्या जागेसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. Form भरताना तसेच कागदपत्र upload करताना खालील कागदपत्र जवळ ठेवणे.**

१. स्वतःचा फोटो
२. पदवी / पदव्युत्तर पदवी असल्यास गुणपत्रक आणि प्रमाणपत्र
३. विशेष शिक्षणातील डी.एड., बी.एड. पूर्ण केले असल्यास गुणपत्रक आणि प्रमाणपत्र
४. ST प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र (cast validity )
५. VJ/NT/OBC आणि SBC प्रवर्गासाठी १ एप्रिल २०१९ नंतर 'ना सायस्तर दाखला' (Non Creamy layer certificate)
६. उमेदवार अपंग असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकाचे किमान ४०% अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र
७. अपंग मुलाचे आई वडील असल्यास मुल अपंग असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सकाचे किमान ४० टक्के अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र

८. आजी / माजी सैनिक स्वतः/ पत्नी/ मुलगा / अविवाहित मुलगी असल्यास जिल्हा सैनिक कार्यालयाचे प्रमाणपत्र

**शिक्षणक्रम शुल्क भरावयाची पद्धत** :
बी.एड. विशेष शिक्षणक्रमाचे अडीच वर्षांसाठी एकूण शुल्क रु. २८,०००/- आहे त्याचे विभाजन पुढीलप्रमाणे

| वर्ष | विद्यापीठ शुल्क (रुपये) आणि अभ्यासकेंद्र शुल्क (रुपये) | एकूण शुल्क (रुपये) |
|---|---|---|
| **प्रथम वर्ष** | ७००० + ७,००० | १४००० |
| **व्दितीय वर्ष** | ५००० + ५,००० | १०,००० |
| **तृतीय वर्ष** | २००० + २,००० | ४,००० |

बी.एड. विशेष शिक्षण हा अडीच वर्षांचा शिक्षणक्रम आहे. त्याचे एकूण शुल्क तीन टप्यात भरावयाचे आहे. प्रथम वर्षाची Online प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशास पात्र उमेदवारांची अंतिम गुणवत्ता यादी वेबसाईट वर प्रसिध्द झाल्यानंतर अभ्यासकेंद्रावर प्रवेश निश्‍चित करताना उमेदवाराने प्रथम वर्षाचे विद्यापीठ शुल्क रुपये ७०००/- online पद्धतीने आणि अभ्यासकेंद्र शुल्क रुपये ७०००/- अभ्यासकेंद्राच्या निर्देशानुसार खात्यात भरावयाचे आहे.

**शिक्षणक्रम समन्वयक** **मा. कुलसचिव**